14. उपरोक्त पदाची कंत्राट तत्वावर नियुक्ती 180 दिवसांपेक्षा जास्त नाही, अशा प्रकारे करण्यात येईल. सदर कालावधीत नियमित तत्वावर भौतिकोपचार तज्ञ या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यात आल्यास, सदर कंत्राटी कर्मचा-याची नेमणूक / सेवा समाप्त करण्यात येईल.

15. उमेदवारास महाविद्यालय व रुग्णालयाच्या नियुक्त केलेल्या ठिकाणी किंवा वेळोवेळी वरिष्ठांच्या आदेशानुसार कामकाजाच्या तीनही पाळ्यांमध्ये काम करावे लागेल.

16. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार सामाहिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त कंत्राटी कर्मचा-यांना लागू असणा-या प्रचलित नियमानुसार नैमित्तिक रजा अनुज्ञेय असतील.

17. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

18. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.

19. ते दररोज नियमाने हजेरी पटावर त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमेट्रीक करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

**<u>विशेष सूचना –</u>**

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) सविस्तर सूचना, याबाबतच्या अटी व शर्ती, मनपाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आल्या आहेत. उमेदवारांनी त्याचे बारकाईने अवलोकन करुन संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या अर्जाच्या तसेच वैयक्तीक माहितीपत्राच्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जाचे विहित शुल्क भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

क) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

डॉ. मोहन जोशी 26/6/24

अधिष्ठाता

लो.टि.वै.महाविद्यालय व रुग्णालय

Scanned with OKEN Scanner

**सर्वसाधारण अटी –**

1. उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व त्यावर त्याने उपलब्ध जागेत स्वाक्षरी करावी.

2. उमेदवाराने पदविका /पदवी परीक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

3. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयात नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

4. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

5. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियुक्तीचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

6. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

7. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

8. निवड झालेल्या उमेदवारांस रुपये 200/- च्या बंधपत्रावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.

9. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकीनंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

10. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

11. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

12. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

13. कंत्राटी डायलिसीस तंत्रज्ञ याला दरमहा एकूण रु. 20,000/- एवढे निश्चित मानधन मिळेल. या वेतना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही. सदर वेतनातून व्यवसाय कर वजावट करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, शीव,मुंबई – 22**

क्र. लोटिरु/.2023/ना.आ.कें.धा.
दि. 03 / 09 /2024

## जाहिरातीचा नमुना

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालय यांच्या आस्थापनेवरील खालील नमुद संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने (प्रत्येक 180 दिवसांच्या कालावधीनंतर 1 दिवसाचा खंड देवून ) भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्ज जाहिराती सोबत जोडले असुन त्याची प्रत (Print) घेण्यात यावी.

सदर पदासाठी रुपये 710/- + 18% जीएसटी रु. 128/- = एकूण रु. 838/- इतके शुल्क लो.टि.म.स. रुग्णालयाच्या रोखपाल विभागात दि. 5-9 .2024 ते 13-09-2024 पर्यत कार्यालयीन वेळेत (शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यत भरून, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून अर्ज लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि. 13-09-2024 पर्यत सादर करावा.

खालील नमुद केलेल्या अर्हता व अटींची पुर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1 | डायलिसीस तंत्रज्ञ | 1 | 20000/- | B. Sc. B.P.M.T. |

a. उमेदवार माध्यामिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

b. उमेदवार ' डीओईएससीसी' सोसायटीचे ' सीसीसी' किंवा ' ओ स्तर' किंवा ' ए स्तर' किंवा ' बी स्तर' किंवा ' सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे ' एम. एस सी. आय. टी.' किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.

**वयाची अट** : वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा अधिक नसावे आणि मागासवर्गीयांकरीता 43 वर्षापेक्षा अधिक नसावे.

Scanned with OKEN Scanner